सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पोलीस विभाग**

थेट दूरध्वनी क्र. :– +९१–२२–२२६२ १२२०
दूरध्वनी केंद्र क्र.:– +९१–२२–२२६२ ०११४
विस्तारित क्र. :– १३८ (पोलीस उप आयुक्त (प्रकटी.))
६२९ (वाचक अधिकारी),
१२१ (स्टेनो), ६२८ (लेखनिक)
ई.मेल :– cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

पोलीस उप–आयुक्त(प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय
पोलीस आयुक्त कार्यालयीन आवार
( नवीन इमारत), चौथा मजला,
महात्मा फुले मंडई समोर
डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई – ४०० ००१

**क्रमांक पोउआ (प्रकटी)/जा.क्र. १६६२/२०२५** **दिनांक ०८/१२/२०२५**

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय, मुंबई.

विषय :– Best Detection of the Month Oct 2025 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month Oct 2025 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' तसेच Best Recovery of the Month Oct 2025 ''उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

**माहे ऑक्टोबर –२०२५** करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात (उत्कृष्ट गुन्हे शोध), बेस्ट कनव्हिक्शन अर्थात (उत्कृष्ट अपराधसिध्दी) तसेच बेस्ट रिकव्हरी अर्थात (उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत)''** याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे यांची निवड करण्यात आलेली आहे. प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

**अ)**

➢ **माहे ऑक्टोबर - २०२५ गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न**

१) **आर.ए.के मार्ग पोलीस ठाणे**, परिमंडळ ०४, मुंबई **गु.र.क्र. ३७२/२०२५**, कलम ३०९(४), १२६(२), ३(५) भा.न्या.सं २०२३ सह कलम ३,२५ शस्त्र अधि १९५९, सह कलम ३७ (१), १३५ म.पो.का.

**ब)**

➢ **माहे ऑक्टोबर - २०२५ सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी**

१) **अ‍ॅन्टॉप हिल पोलीस ठाणे**, परिमंडळ ०४, मुंबई गु.र.क्र. **२६२/२०२०**, कलम ३०२, ३०७, ३२३, ५०६, ५०४ भा.दं.वि.स कलम ३७(अ)(१),१३५. म.पो.का.

२) **दिंडोशी पोलीस ठाणे**, परिमंडळ १२, मुंबई गु.र.क्र. **४७६/२०१४** कलम ३०२, १२०(ब), ५०६ भादंवि सह कलम ३७ (१) म.पो.का.

**क)**

➢ **माहे ऑक्टोबर - २०२५ सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत**

१) **लो.टि.मार्ग पोलीस ठाणे**, परिमंडळ ०२, मुंबई गु.र.क्र. **११२४/२०२५**, कलम ३०६ भा.न्या.सं. २०२३

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ) तसेच उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत (बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ) **माहे ऑक्टोबर – २०२५** बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

**सही/–**

पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

**प्रत**:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक ०३/१२/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“BEST DETECTION OF THE MONTH”** माहे **ऑक्टोबर २०२५** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर २०२५ — ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | **र.अ.कि.मार्ग पो.ठाणे**<br>परिमंडळ ०४, मुंबई. | गु.र.क्र. ३७२/२०२५ कलम ३०९(४),१२६(२), ३(५) भा.न्या.सं २०२३ सह कलम ३,२५ शस्त्र अधिनियम १९५९, सह कलम ३७ (१), १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ |

**—: “ अग्निशस्त्राचा धाक दाखवुन जबरी चोरी ” :—**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात फि’ यांची कंपनी मास्टरचैन अॅन्ड ज्वेलर्सचे हॉलमार्ककामी क्वालिटी अस्साय अॅन्ड हॉलमार्क एलएलपी या कंपनीकडे देण्यात आलेले सोन्याचे दागिने सदर कंपनीमधुन ताब्यात घेवून फॅक्टरीकडे परत जात असताना शिवडी कोर्ट शेजारील चौकाच्या पुढे फि’ यांच्या गाडीचा पाठलाग करणाऱ्या अनोळखी इसमांनी फि यांच्या गाडीला धक्का देवून त्यांना थांबण्यास भाग पाडले व मोटार सायकलवरील मागील इसमाने त्याच्या जवळील पिस्टल जगदीश केराभाई आल याच्या दिशेने रोखून व पिस्टल हवेत फिरवून त्याच्या ताब्यातील काळया रंगाच्या बॅगेत ठेवलेले २०६७.१४३ ग्रॅम वजनाचे एकूण **२,२९,४०,७०५.६८/— रू** किंमतीचे सोन्याचे दागिणे बळजबरीने बॅगसहित घेवून मोटार सायकलवरून पळुन गेले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. शामलाभाई होथीभाई रबारी, वय ३१ |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :— | २०६७.१४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेगवेगळे दागिने एकूण किंमत रूपये **२,२९,४०,७०५/—** |
| हस्तगत मालमत्ता | :— | २१८० ग्रॅम वजनाचे सोन्याचे वेगवेगळे दागिने एकूण किंमत रूपये **२,२९,४०,७०५/—**<br>**एक गावठी बनावटीचा देशी कट्टा अग्नीशस्त्र,एक जिवंत काडसूस** |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) भानाराम भगराज रबारी, वय २१<br>२) लिलाराम नागजी देवासी, वय २१<br>३) श्री. शामलाभाई होथीभाई रबारी उर्फ श्रंकर, वय ३१<br>४) जोगाराम मसरूराम देवासी उर्फ मोठा जगदीश,<br>**अटक दि. १६/१०/२०२५** |

**तपास कौशल्य:—**गुन्हयातील अज्ञात आरोपीताबाबत काहीही माहीती नसताना सिसिटिव्ही फुटेजवरून अज्ञात आरोपीची चेहरेपट्टी मोटार सायकलचा शोध घेण्यात आला. गुन्हयातील मोटार सायकलचा क्रमांक शोधण्यात आला. मोटार सायकल क्रमांकावरून चालकाचा पत्ता शोधण्यात आला. फिर्यादीकडुन गुन्हयाच्या चोरीस गेलेल्या मालमत्तेबाबत विरपुस करण्यात येवुन आरोपीतांचा शोध घेण्यात आला. आरोपीचा संपर्क क्रमांक, बॅक खाते, युपीआय आयडी वरून राहते ठिकाणाचा शोध घेण्यात आला. आरोपीतांना अहमदाबाद, गुजरात राज्य येथे सापळा लावुन अटक करण्यात आले. आरोपीकडुन दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली २०६७.१४३ ग्रॅम वजनाचे एकूण २,२९,४०,७०५.६८/—रू किंमतीचे सोन्याचे दागिणे ही मालमत्ता अंगझडती पंचनाम्याव्दारे हस्तगत करण्यात आली.

### र.अ.कि.मार्ग पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | विनोद तुकाराम तावडे | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहा.पोलीस निरीक्षक | गोविंद विजय खैरे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा.पोलीस निरीक्षक | शिवाजी कृष्णा मदने | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस उप निरीक्षक | प्रविण आकाराम पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ह.क्र. ०६०३७८ | अनिल परशुराम कोळेकर | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. ०८१०२९ | अमित मोहन रामसिंग | प्रशस्तीपत्रक |

....................

**मजकुर :—**

दिनांक ०३/१२/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या **"BEST CONVICTION OF THE MONTH"** माहे ऑक्टोबर २०२५ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोबर २०२५ — ०२ गुन्हे

| | | |
|---|---|---|
| ०१ | **ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे**, परिमंडळ ०४, मुंबई. | गुरक्र व कलमः— **२६२/२०२०** कलम ३०२,३०७,३२३,५०६, ५०४ भा.दं.वि. सह कलम ३७(अ)(१),१३५ महारा ट्र पोलीस कायदा. |

**—: " चाकुने भोसकुन जिवे ठार मारणे ":—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील आरोपी याने सुलतान हरविलेल्या त्याच्या शोभेच्या तलावरीचे पैसे भरून दयावेत या कारणावरून सुलतान चे वडिलांबरोबर सुरू असलेला वाद मिटविण्यासाठी नकी व मुस्तकीमला जावुन सांगत असताना त्यांना शिवीगाळ व मारहाण करून त्यास त्यांनी प्रतिकार केला असता त्याच्या कडील बटन चाकु ने धमकावुन व शिवीगाळ करीत पळुन जात असताना त्याला पकडण्याकरीता नकी व मुस्तकीम धावले असता आरोपीने त्याच्या हातातील बटन चाकु **नकीच्या** छातीमध्ये भोसकुन खुन करून जिवे ठार मारले व **मुस्तकीम** यास पाठिवर चाकुने भोसकुन त्यास गंभीर दुखापत केले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | सलमान इरफान खान, वय २५ |
| निकाल दिनांक | :— | दि. १७/१०/२०२५ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | शबीर शाहिद शेख उर्फे बब्बीर, वय २१<br>**अटक दिनांक**:— ०४/०९/२०२० |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात श्री. एस.एस अदकर, मा. सत्र न्यायालय, कोर्ट क्र.१९, मुंबई यांनी आरोपी यास दि. १७/१०/२०२५ रोजी<br>**०१)** कलम ३०२ भादवि करीता जन्मठेप व रूपये १५,०००/— दंड व दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद.<br>**०२)** कलम ३०७ भादवि करीता १० वर्षे कारावास व रूपये १०,०००/— दंड व दंड न भरल्यास ०६ महिने साधी कैद<br>**०३)** कलम ५०६ भादवि करीता २ वर्षे कारावास व रूपये ५,०००/— दंड व दंड न भरल्यास ०१ महिना साधी कैद ही शिक्षा सुनावण्यात आली. |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयामध्ये साक्षीदार व पुरावा प्राप्त करून सदर गुन्हयाचा योग्य तपास करून गुन्हयाचे दोषारोप पत्र विहीत वेळेत मा. न्यायालयात सादर केले. गुन्हयाची सुनावणी चालु असताना साक्षीदर व पुरावा हे मा. न्यायालयात हजर केले. त्याअनुषंगाने मा. सत्र न्यायालयात सुनावणी पुर्ण होवुन मा. न्यायालयाने अटक आरोपी नामे शब्बीर शाहिद शेख उर्फ बब्बीर वय २१ वर्षे, यास दिनांक १७/१०/२०२५ रोजी जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

नमुद गुन्हयात दोषसिध्दी प्राप्त करून गुन्हयातील आरोपीस शिक्षा मिळणेकरीता तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

**ॲन्टॉप हिल पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | गोपाळ बाबुराव भोसले | प्रशस्तीपत्रक |
| २ | पो.ह.क्र ३४५४९ | उत्तम गंगाराम आंग्रे | प्रशस्तीपत्रक |

..............................

| ०२ | **दिंडोशी पोलीस ठाणे**,<br>परिमंडळ १०, मुंबई. | गुरक्र व कलमः— **४७६/२०१४** कलम ३०२, १२०(ब), ५०६ भादंवि सह कलम ३७(१) म.पो.का. |
|---|---|---|

**—: " स्क्रु ड्रायव्हरने वार करून जिवे ठार मारणे " :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात फि' यांची मुलगी नामे असीमाबानो हिस ती इंग्लीश स्पीकींग क्लास वरून परतत असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले म्हणुन गुन्हा नोंद.

तद्नंतर बळीत मुलीच्या पुरवणी जबाबावरून तिला लग्नाचे आमिष दाखवुन आरोपीताने जबरदस्तीने लैंगिक संबंध प्रस्थापित केले त्यामुळे कलम ३७६ भादवि सह ४,८,१२ पोक्सो ॲक्ट.२०१२ प्रमाणे कलम वाढ करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | अब्बास मोहम्मद ईस्माईल शेख, वय ६१ |
| निकाल दिनांक | :— | दि. ०६/१०/२०२५ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | इरफान फतेह खान,वय २५<br>**अटक दिनांक**:— २५/१२/२०१६ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात श्री. नंदकिशोर मोरे, मा. अति. सत्र न्यायालय, कोर्ट क्र.१२, मुंबई यांनी आरोपी यास दि. १७/१०/२०२५ रोजी कलम ३०२ भादंवि अन्वये आजन्म कारावास (जन्मठेप) व रु. २,०००/— द्रव्यदंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे सक्त मजुरी ही शिक्षा सुनावण्यात आली. |

**तपास कौशल्य** :— नमूद गुन्हयामध्ये यातील फिर्यादी, साक्षीदार, पंच यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन मा. न्यायालयात साक्षीकरीता वेळेवर हजर ठेवले. त्याचप्रमाणे गुन्हयातील आरोपीविरुध्दचे पुरावे सक्षमपणे मा. न्यायालयासमोर मांडण्यास मदत केली. त्यामुळे सदर गुन्हयात मा. न्यायालय यांनी अटक आरोपी रणजित रामलाल चौहान यास आजन्म कारावास (जन्मठेप) व रु. २,०००/— द्रव्यदंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे सक्त मजुरी ही शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

नमुद गुन्हयात दोषसिध्दी प्राप्त करून गुन्हयातील आरोपीस शिक्षा मिळणेकरीता तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

## दिंडोशी पोलीस ठाणे, मुंबई तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/अंमलदार नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | शरद चंद्रकांत सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | सर्वोत्तम आत्माराम भोगले | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र. ०५.०७८६ | संतोष वसंत कर्पे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र. ०९.०६१२ | अतुल दिलीप माने | प्रशस्तीपत्रक |
| ५ | म.पो.शि.क्र.११.२१०८ | उज्वला प्रकाश माळी | प्रशस्तीपत्रक |

...........................

**मजकुर :–**

दिनांक ०३/१२/२०२५ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **"BEST RECOVERY OF THE MONTH"** माहे **ऑक्टोबर २०२५** या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (क) १) बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ ऑक्टोबर २०२५ – ०१ गुन्हा

| | | |
|---|---|---|
| ०१ | **लो.टि.मार्ग पो.ठाणे**<br>परिमंडळ ०२, मुंबई. | गु.र.क्र. ११२४/२५ कलम ३०६ भारतीय न्यय संहिता. |

**–: " नोकराने केलेली चोरी (कारखान्यातील कामगार) " :–**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :– नमुद गुन्हयात व्यापारी विनायक जोशी यांनी सोने दागिने बनविण्यासाठी फि' कडे दिलेली ०१ करोड रोख रक्कम ही सुरक्षेकामी कारखान्यातील कपाटामध्ये ठेवली असता, सदर कारखान्यामध्ये काम करणारा सोने कारागीर किशोर मिस्त्री याने फि' यांचे संमतीशिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरून घेऊन गेला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. बंकिम भुवन सांमता , वय– ५७, धंदा –सोने कारागीर |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :– | एकुण १,००,०१,५००/– रूपये |
| हस्तगत मालमत्ता | :– | एकुण १,००,०१,५००/– रूपये |
| आरोपी अटक व दिनांक | :– | किशोर हरीपदा मिस्त्री, वय ४८<br>**अटक दि**. २६/१०/२०२५ |

**तपास कौशल्य :–** गुन्हयाच्या तपासा दरम्यान खास बातमीदाराने दिलेल्या माहिती वरून व गुन्हयाच्या तांत्रिक तपासा वरून नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी किशोर मिस्त्री, वय ४८ हा शिर्डी, अहिल्यानगर येथे असल्याबाबत माहिती प्राप्त झाल होती. नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी किशोर मिस्त्री याचा शोध घेणेकामी मा. वरि ठांच्या परगवानगीने शिर्डी, अहिल्यानगर येथे रवाना झालो. पाहिजे आरोपी किशोर मिस्त्री याचा शिर्डी अहिल्यानगर येथे शोध घेतला असता, कौस्तुभ हॉटेल येथे तपास केला असता, पाहिजे आरोपी हा दि. २२/१०/२५ रोजी ते दि. २६/१०/२५ रोजी पर्यंत हॉटेल बुक करून वास्तव्यास होता. परंतु सदरचे पथक त्या हॉटेलवर पोहचण्यापुर्वीच पाहिजे आरोपीताने १९:३०वा चेक आऊट केले होते. पाहिजे आरोपीतचा माग काढला असता, पाहिजे आरोपी हा एसटी महामंडळाच्या बस ने नाशिक येथे गेला असल्याचे निष्पन्न झाले. नाशिक रोड रेल्वे स्टेशनचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, पाहिजे आरोपी हा नाशिक रेल्वे स्टेशन येथुन हावडा मेल पकडुन गेला असल्याचे निष्पन्न झाले.

त्याअनुषंगाने वरिष्ठांना अवगत करून उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश यांना अवगत करण्यात आले. नमुद पाहिजे आरोपीतास माणिकपुर रेल्वे पोलीस, उत्तर प्रदेश यांनी पाहिजे आरोपीतास माणिकपुर रेल्वे पोलीस, उत्तर प्रदेश यांनी ताब्यात घेतले असल्याबाबत कळविले. नमुद पाहिजे आरोपीताचा मा. वरि ठांच्या परवानगीने माणिकपुर रेल्वे पोलीस, उत्तर प्रदेश येथे रवाना झालो. नमुद अटक आरोपीतास माणिकपुर रेल्वे पोलीस ठाणे यांच्याकडुन ताब्यात घेवुन त्याच्याकडे नमुद गुन्हयाबाबत तपास केला असता, त्याचा नमुद गुन्हयामध्ये सहभाग नि पन्न झाल्याने व त्याने गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने त्यास मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करून माणिकपुर रेल्वे पोलीस ठाणे, उत्तर प्रदेश येथे दि. २६/१०/२५ रोजी १५:०० वा. अटक करून त्यास मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, माणिकुपर न्यायालय, जि. चित्रकुट, उत्तर प्रदेश यांच्याकडे ट्रान्जिट रिमांडकामी हजर केले असता, मा. न्यायालयाने अटक आरोपीतास दि. २८/१०/२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केले. माणिकपुर रेल्वे पोलीसांनी अटक आरोपीतास ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडुन रोख रू. ८०,०१,५००/– जप्त केले होते. सदरची रक्कम माणिकपुर रेल्वे पोलीस, उत्तर प्रदेश यांच्याकडुन ताब्यात घेण्यात आली आहे.

नमुद अटक आरोपीताकडे उर्वरीत मालमत्तेबाबत तपास केला असता, त्याने उर्वरीत रू. २०,००,०००/– ही बॅकेतुन त्याच्या नातेवाईकांना ट्रान्सफर केले असल्याबाबत माहिती दिली. तयांचे नामेवाईकांनी आरोपीताच्या खातेवर उर्वरीत रू. २०,००,०००/– ही रक्कम ट्रान्सफर केली. ती रक्कम काढुन घेण्यात आली आहे.

**टिप:—** वरिष्ठ/प्रभारी पोलीस निरीक्षक, र.अ.कि.मार्ग पोलीस ठाणे यांना Best Detection of the Month **Oct 2025** व ॲन्टॉप हिल व दिंडोशी पोलीस ठाणे यांना Best Conviction of the Month **Oct 2025** तसेच लो.टि.मार्ग पोलीस ठाणे यांना Best Recovery of the Month **Oct 2025** या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of the Month) व सर्वोत्कृष्ट अपराध सिध्दी (Best Conviction of the Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म. रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद **प्रपत्र 'क'** प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व अंमलदार यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटक प्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

# Best Detection of the Month

## ‘प्रपत्र ‘क’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) F.I.R प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब, शवविच्छेदन अहवाल, ओळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A)** साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B)** पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C)** परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D)** तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E)** वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F)** तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G)** पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H)** सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# BEST RECOVERY OF THE MONTH

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गेलेला माल | |
| ०५ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०६ | गुन्हा उघडकीस आणणारे अधिकारी, अंमलदार | |
| ०७ | गुन्हा उघडकीस आला तारीख | |
| ०८ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १० | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ११ | भा.द.वि. कलम ४११ ते ४१४ प्रमाणे कारवाई केली आहे का? | |
| १२ | मोका अंर्तगत कारवाई केली असल्यास आरोपीची मालमत्ता जप्ती प्रक्रियेबाबत केलेल्या कारवाईचे विवरण | |
| १३ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, केस क्रमांक, न्यायालय | |
| १४ | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी केलेल प्रयत्न.<br>a) घटनास्थळावरून प्राप्त पुरावे ( घटनास्थळ पंचनामा जोडावा)<br>b) तपासलेले साक्षीदार संख्या<br>c) गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सांक्षीदारांची कशी मदत झाली<br>d) Dog Squad ph enr<br>e) Fingerprint / Handwriting Expert ph enr<br>f) Cyber Expert ph enr<br>g) FORENSIC Expert ph enr<br>h) CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence माहिती<br>i) गुन्हेगारां संदर्भातील रेकॉर्ड /हिस्ट्रीशीट KCR इतर तपासले असल्यास त्या संदर्भातील इतर गुन्हयांची माहिती<br>J) गुप्त बातमीदार /गोपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली<br>k) परत मिळालेल्या मालाची कार्यकारी दंडाधिकारी समोर ओळख्र पटवली आहे का ?<br>l) मौल्यवान मालाचे मुलयांकन करून घेतले आहे का ? | |
| १५ | तपासाकरीता योगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केल्याची प्रत प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# <u>INTEGRITY CERTIFICATE</u>

Certified that the integrity of Mr/Mrs ………………………………., Designation- …………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2025 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2025